मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडकरांची वाहन खरेदीला पसंती

## नऊ दिवसांच्या कालावधीत पाच हजार 588 वाहनांची नोंदणी : 37 कोटी 40 लाख 26 हजारांचा महसूल प्राप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पिंपरी-चिंचवडकरांनी वाहन खरेदीला पसंती दिली. पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) १ ते ९ एप्रिल २०२४ या नऊ दिवसांच्या कालावधीत पाच हजार ५८८ वाहनांची नोंदणी झाली. त्यापोटी ३७ कोटी ४० लाख २६ हजारांचा महसूल प्राप्त झाला आहे.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर घर, सोने आणि वाहनांची खरेदी करणे शुभ मानले जाते. मुहूर्तावर वाहन नेण्यासाठी अनेकांची पसंती असते. त्यामुळे वाहनांची आगाऊ नोंदणी केली जाते. त्यानुसार उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नऊ दिवसांत साडेपाच हजार वाहनांची नोंदणी झाली. त्यामध्ये सर्वाधिक तीन हजार ४४ दुचाकींची खरेदी झाली. त्याखालोखाल एक हजार ८३५ मोटारींची विक्री झाली. तर, १७५ ई-वाहनांची नागरिकांनी खरेदी केली आहे. यामध्ये १३५ दुचाकी, ३५ मोटारी, पाच इतर वाहनांचा समावेश



असल्याची माहिती उपप्रादेशिक अधिकारी अतुल आदे यांनी दिली.

दरम्यान, वाहन खरेदीसाठी नागरिकांना वाहन विक्रेत्यांकडून विविध आकर्षक योजना जाहीर करण्यात आल्या होत्या. दुचाकीवर हेल्मेट, अॅक्सेसरीज मोफत देऊन ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**दुचाकी – २,९६२**
**चारचाकी – १,८५८**
**रिक्षा – १४३**
**मालवाहतूक वाहने – २९३**
**इतर वाहने – २३९**

# पिंपरीत विचार प्रबोधन पर्वाची जय्यत तयारी

## महापालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्व 2024 चे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने आजपासून 15 एप्रिल 2024 दरम्यान पाच दिवसीय विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. या अनुषंगाने विचार प्रबोधन पर्वाचे संयोजक तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह तयारीच्या कामाची पाहणी करून आढावा घेतला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारकाशेजारील मैदानात क्रांतिसूर्य महात्मा जोतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. महानाट्य, लाईव्ह कॉन्सर्ट, गीत गायन, पोवाडे, कव्वाली, एकपात्री नाट्यप्रयोग, मतदान जनजागृती अशा विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये स्थानिक तसेच दिग्गज कलावंतांचा समावेश असणार आहे. प्रबोधन पर्व तसेच जयंतीच्या काळात महापालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांमध्ये कोणतीही कमतरता भासणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी प्रशासनाला दिले आहेत.

त्यामुळे सर्व संबंधित विभाग तयारीला लागले आहेत. अतिरिक्त आयुक्त तथा प्रबोधन पर्वाचे मुख्य संयोजक उल्हास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधन पर्वाची जय्यत तयारी सुरु आहे.



महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीचा आढावा आणि पाहणी संयोजक तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन केली. यावेळी प्रबोधन पर्वाचे संयोजक तथा उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, विनय ओहोळ, विशेष अधिकारी किरण गायकवाड यासह उद्यान, आरोग्य आणि पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, सर्व कार्यक्रम उत्तम पद्धतीने आणि नियोजनबद्ध पार पडावेत यासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व आवश्यक व्यवस्था करण्याबाबतचे सबंधित विभागास आदेश देण्यात आले आहेत. विचार प्रबोधन पर्व मोठ्या उत्साहात साजरे करण्यासाठी महापालिकेने जय्यत तयारी केली आहे. पिंपरी, एचए कॉलनी, आणि दापोडी येथील पुतळा परिसरात आवश्यक विद्युत रोषणाई तसेच पुतळा रंगरंगोटी, सुशोभिकरण करण्यात आले आहे.

क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वाच्या पाच दिवसीय कार्यक्रमांना तसेच पिंपरी येथील एच.ए. मैदानावर दि. 15 एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेले मूकनायक हे महानाट्य पाहण्याकरीता नागरिकांची संभाव्य गर्दी विचारात घेता या ठिकाणी महापालिकेने सर्व आवश्यक तयारी सुरु केली आहे, असे संयोजक डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले. महानाट्य पुर्णपणे मोफत असून या महानाट्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. तरी प्रबोधन पर्वातील सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे आणि कार्यक्रमांचा आनंद घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# ट्रॅफिक सिग्नलवर तृतीयपंथींना पैसे मागण्यास बंदी

## पुणे पोलिसांचा मोठा निर्णय : बळजबरीने पैसे मागणाऱ्या तृतीयपंथीयांवर कठोर कारवाई होणार

**पुणे | प्रतिनिधी**

ट्रॅफिक सिग्नलवर किंवा घरगुती समारंभात तृतीयपंथीयांकडून पैसे मागण्याचे प्रकार नवे नाहीत. पण कधी कधी तृतीयपंथीयांकडून पैसे मागण्यासाठी बळजबरी करण्यात येते. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर तृतीयपंथी वाद घालतात. ट्रॅफिक सिग्नलवर वाद घातल्यामुळे वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तृतीयपंथीयांची ही मनमानी रोखण्यासाठी पुणे पोलिसांनी आता कारवाईचा बडगा उगारला असून बळजबरीने पैसे मागणाऱ्या तृतीयपंथीयांवर फौजदारी संहिता प्रक्रियेच्या कलम १४४ नुसार कारवाई केली जाणार आहे. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बुधवारी यासंबंधीचे संकेत दिले.

ट्रॅफिक सिग्नल आणि सार्वजनिक व घरगुती समारंभात आमंत्रणाशिवाय घुसखोरी करून पैसे मागणाऱ्या तृतीयपंथीयांवर कारवाई केली जाणार असल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी जाहीर केले आहे.

अमितेश कुमार नागपूर शहराचे आयुक्त असताना त्यांनी अशाच प्रकारचे आदेश यापूर्वी दिले होते. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४४ नुसार जिल्हा न्यायदंडाधिकारी आणि दंडाधिकारी अधिकार असलेल्या अधिकाऱ्यांना सार्वजनिक उपद्रव रोखण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होईल, अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय राबविण्याचे आदेश देता येतात.



पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, तृतीयपंथींच्या छळवणुकीबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर याप्रकारचे प्रतिबंधात्मक उपाय हाती घेण्यात आले आहेत. पुणे पोलिसांनी काढलेल्या पत्रकात म्हटले की, आमच्या निर्दशनास आल्यानुसार काही लोकांचे गट आणि विशेषतः तृतीयपंथी लग्न, इतर धार्मिक समारंभ, कुटुंबातील जन्म, मृत्यू यांसारख्या प्रसंगी एकत्र्याने किंवा एकत्रितपणे लोकांच्या घरी जमतात आणि जबरदस्तीने पैशांची मागमी करतात.

पैसे न दिल्यास अश्लील आणि धमकावणारे वर्तन करतात. लोक स्वेच्छेने देत असल्यापेक्षा जास्त पैसे मागितले जातात, असे निदर्शनास आले आहे. बेकायदेशीरपणे एकत्र येणे, खंडणी वसूल करणे, सार्वजनिक उपद्रव निर्माण करणे इत्यादी गुन्ह्यांसह आयपीसीच्या विविध कलमांखाली दंडनीय गुन्हा असले तरी अशा घटकांच्या भीतीमुळे अनेक लोक तक्रार करण्यासाठी पुढे येऊ शकत नाहीत. म्हणून अशा प्रकारच्या उपद्रवी आणि जनतेला धोका निर्माण करणाऱ्या घटकांना रोखण्याच्या दृष्टीकोनातून सदर आदेश देण्यात येत आहेत.

# मतदार जागृतीच्या फलकावर 'इन्कलाब जिंदाबाद'

## पुण्यातील प्रतिष्ठित गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत धक्कादायक प्रकार

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या सगळीकडे लोकसभेच्या निवडणुकीची तयारी सुरु आहे. त्यासाठी मतदानासाठी जागृती करण्यात येत आहे. एवढंच नाही तर काही उपक्रमदेखील राबवण्यात येत आहे. त्यातच पुण्यातील प्रतिष्ठित गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मतदान जागृतीसाठी लावलेल्या फलकावर 'इन्कलाब जिंदाबाद', 'नोटा' लिहिण्यात आलं आहे. या प्रकारामुळे काही विद्यार्थी संघटना संतापल्या आहेत.

गोखले संस्थेतील इलेक्टोरल लिटरसी क्लब अँड आर्ट क्लब यांच्यातर्फे वॉल ऑफ डेमोक्रेसी तयार करण्यात आली होती. या फलकावर मतदारासंदर्भात जनजागृती करण्यात आली होती. त्यावर स्वाक्षऱ्यांसाठी देखील जागा ठेवण्यात आली.

मतदार जागृती करण्याच्या उपक्रम राबवण्यासाठी हा फलक लावण्यात आला होता. निवडणूक आयोग, भारत सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे लोगो लावण्यात आले. याच बोर्डावर थेट नोटा आणि इन्कलाब जिंदाबाद, असं लिहिण्यात आल्याचं समोर आलं. सुरुवातीला हा प्रकार कोणी केला आहे. याचा थानपत्ता लागला नाही मात्र काही वेळाने सीसीटीव्ही तपासून ज्या विद्यार्थ्यांनी हा प्रकार केला त्या दोन विद्यार्थ्यांना संस्थेने ताब्यात घेतलं आहे आणि त्यांच्याकडून चौकशी केली जात आहे.

**लोकशाहीची हत्या करणारे नेमके कोण आहेत?**

हा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर अनेक प्रतिक्रिया उमटल्या. पुण्यातील नामवंत इन्स्टिट्यूट गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पुणे येथील




अकॅडमी बिल्डिंगमध्ये गेल्या काही दिवसांपासून लावलेल्या इलेक्शन कमिशनच्या पोस्टरवर लोकशाही विरुद्ध व देश विरोधी गोष्टी लिहून त्याची छेड-छाड करण्यात आली आहे. या पोस्टर मध्ये गोखले इन्स्टिट्यूटचा व इलेक्शन कमिशनचा लोगो वापरून नोटा या पर्यायाला मतदान करा अशा पद्धतीचा मजकूर आढळून आला. अशा पद्धतीचे बॅनर हे गोखले इन्स्टिट्यूटमध्ये गेले दोन-तीन दिवस लागले आहेत तरीसुद्धा त्यावर प्रशासनाकडून कोणत्याही पद्धतीची कारवाई करण्यात आली नाही. इन्कलाब झिंदाबाद घोषणेमागून लोकशाहीची हत्या करणारे नेमके कोण आहेत? या पोस्टची छेड-छाड करणार्या विरोधात जर लवकरात लवकर कारवाई केली नाही तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा ABVP कडून देण्यात आला.

**विद्यार्थ्यांची चौकशी सुरु आहे; अजित रानडे**

आमची संस्था 93 वर्ष जुनी आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदान जागृतीसाठी बोर्ड लावण्यात आले होते. त्यावर नोटा आणि इन्कलाब जिंदाबाद असं लिहिल्याचा प्रकार समोर आला. ही घटना साधारण 36 तासांपूर्वी झाली आहे. हे समोर आलं त्यावेळी आमच्या संस्थेचे सीसीटीव्ही चेक करण्यात आले. त्यात दोन विद्यार्थ्यांना पकडलं गेलं आहे. त्या विद्यार्थ्यांनी माफी मागितली आहे. त्यांची चौकशी करत आहोत, असं गोखले संस्थेचे उपकुलगुरु अजित रानडे यांनी सांगितलं आहे.

# पाणीपुरवठा पूर्ववत, मात्र तक्रारींचा ओघ

## शहरातील पाणीपुरवठा आठ दिवस विस्कळीत : थेरगाव, वाकड भागातून पाणीटंचाईच्या तक्रारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात मोठी घट झाल्याने संपूर्ण शहरातील पाणीपुरवठा आठ दिवस विस्कळीत झाला होता. आता आंद्रातून पूर्वीप्रमाणे ८० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे. पण, पाणीटंचाईच्या तक्रारी कायम आहेत. थेरगाव, वाकड भागातून पाणीटंचाईच्या तक्रारी पालिकेकडे येत आहेत. दरम्यान, पाणीपुरवठा विभागाने नळाला थेट मोटार लावून पाणी घेणाऱ्या रहिवाशांवर धडक कारवाई सुरू केली आहे. आतापर्यंत १९ मोटारी जप्त केल्या आहेत.

मागील चार वर्षांपासून पिंपरी-चिंचवड शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. एप्रिल, मे महिन्यात अपुरा, कमी दाबाने पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ होते. त्यातच आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात मोठी घट झाली होती. चार दिवस अवघे २१ एमएलडी पाणी शहरासाठी मिळाले होते. ५९ एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाल्याने समाविष्ट गावांसह उपनगरांमध्ये पाणी समस्या भीषण झाली होती. झपाट्याने विस्तारत असलेल्या वाकड, थेरगाव, ताथवडे, पुनावळे, चऱ्होली, मोशी, डुडुळगाव या उपनगरांमध्ये पाणी समस्या गंभीर झाली होती.

महापालिका प्रशासनाने तातडीने पावले उचलत पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानुसार पूर्वीप्रमाणे ८० एमएलडी पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पाणीपुरवठा पूर्ववत झाला आहे. मात्र, तक्रारी कायम आहेत. अपुरा, कमी दाबाने पाणी मिळत असल्याच्या तक्रारींचा ओघ महापालिकेच्या 'सारथी हेल्पलाइन'वर सुरूच आहे. तक्रारी वाढल्याने पालिकेने पवना धरणातून १० एमएलडी पाणी अधिकचे उचलण्यास सुरुवात केली आहे.



**शहरासाठी दिवसाला ६१५ एमएलडी पाणी**

शहरवासीयांना मावळातील पवना धरणातून आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. महापालिका दिवसाला पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १५ असे ६१५ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उचलते. त्यानंतरही पाणीपुरवठ्याच्या तक्रारी कायम आहेत.

**१९ मोटारी जप्त**

सांगवी भागात नागरिकांकडून नळाला थेट मोटार लावून पाणी घेतले जात होते. त्यामुळे परिसरातून अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्यानंतर पाणीपुरवठा विभागाच्या पथकाने पाहणी केली. नळाला थेट मोटार लावून पाणी घेणाऱ्या १९ मोटारी जप्त केल्या असून, कारवाई यापुढेही सुरूच राहणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

**कर्मचारी निवडणूक कामात**

पाणीपुरवठा विभागामधील २०० पैकी ७०पेक्षा जास्त कर्मचारी निवडणुकीच्या कामात गुंतले आहेत. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या तक्रारी निकाली काढण्यात विलंब होत आहे. आंद्रा धरणातून मिळणारे पाणी पूर्ववत झाले आहे. नळाला मोटार लावून पाणीउपसा करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. पुरेसे कर्मचारी नसल्याने कारवाईला मर्यादा येत असल्याचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी सांगितले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामकाजातून वगळण्याची सूचना सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना केली आहे. त्यांच्या जागी राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असल्याचे सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त विठ्ठल जोशी यांनी सांगितले.

# माझ्या मनाला मुरड घालून मी माघार घेतली

## सासवडच्या पालखीतळावर मेळावा : सभेपूर्वी विजय शिवतारेंची कबुली

**पिंपरी | प्रतिनिधी**

विजय शिवतरे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून मनाला मुरड घालून माघार घेतली असल्याची कबुली दिली आहे. पुरंदर तालुक्यातील सासवडच्या पालखीतळावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यापूर्वी शिवातरेंनी माध्यमांशी बोलताना हे विधान केलं आहे. लोकांच्या हितासाठी आणि महायुतीसाठी बारामती लोकसभा मतदारसंघातून माघार घेतला असल्याचं विजय शिवतरे यांनी म्हटलं आहे.

**विजय शिवतारे नेमकं काय म्हणाले?**

मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यामुळे मी निवणजुकीतून माघार घेतली. निवडणुकीतून माघार घेण्याची माझी कोणतीही मानसिकता नव्हती. निवडणूक लढवण्याची संपूर्ण तयारी झाली होती. कार्यकर्तेदेखील कामाला लागले होते. मात्र मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यामुळे मला माघार घ्यावी लागली. राज्यातील अनेक ठिकाणी अपक्ष उमेदवार निवडणूक लढवत आहेत. या अपक्ष उमेदवारांमुळे मतांची विभागणी होईल. त्याचा फटका महायुतीच्या उमेदवाराला होऊ शकतो, असं महायुतीच्या नेत्यांना वाटत होतं. आपल्यामुळे महायुतीला आणि मुख्यमंत्र्यांना त्रास होऊ नये, यासाठी माघार घेतल्याचं ते म्हणाले.

'मागील पाच वर्ष वाया गेल्याचा आमचा राग आहे. पाण्याचा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. विमानतळ, बाजार, पुरंदरमधील आयटी हब अडकलं आहे. या आयटी हबमुळे अनेक तरुणांना नोकऱ्या मिळाल्या असत्या मात्र ती कामं अडकली,असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासोबतच जेजुरीसाठी 100 कोटी मिळावेत, अशी मागणी केली होती. ही देखील पूर्ण झाली नाही. असे एकूण 13 मागण्या आहेत या मागण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत म्हणून आमचा राग असल्याचं शिवतारेंनी स्पष्ट केलं आहे.



**देवेंद्र फडणवीस येणार का?**

शिवतारे म्हणाले की, या सासवडच्या सभेला देवेंद्र फडणवीस येणार होते. मात्र नांदेडमध्ये अमित शहांची सभा आहे. त्यांनी राज्याच्या नेता म्हणल तिकडे जावं लागणार आहे. त्यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. या सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार असल्याचं शिवतरेंनी सांगितलं आहे. बारामती लोकसभा मतदार संघात महायुतीसाठी काम करणार आहे. त्यामुळे सुनेत्रा पवारांच्या प्रचाराला आम्ही लागलो आहे. येत्या निवडणुकीत त्यांनाच विजयी करु, असा विश्वास शिवतारेंनी व्यक्त केला आहे.

# ब्रिटीशकालीन बंगले होणार इतिहासजमा!

## ‘पीडब्ल्यूडी’ पाडणार विमानतळ रस्त्यावरील सव्वाशे वर्षांपूर्वीचे सोळा बंगले, होणार नवी सरकारी कार्यालये

**पुणे | प्रतिनिधी**

येरवड्यातील विमानतळ रस्त्यावर शंभर ते सव्वाशे वर्षांपूर्वीचे सोळा ब्रिटीशकालीन बंगले आहेत. या बंगल्यांमध्ये पूर्वी ब्रिटीश अधिकाऱ्यांचे वास्तव्य होते. हे बंगले इतिहासाची साक्ष देत आहेत. प्रत्येक बंगले वास्तुस्थापत्याचा नमुना आहे. यामध्ये प्रशस्त खोल्या, दगड व लाकडापासून केलेले बांधकाम आहे. सर्व खोल्यांमध्ये खेळती हवा असल्यामुळे ऐन उन्हाळ्यांतही थंड वातावरण बंगल्यात राहते. बंगल्यांभोवती मोकळी जागा आहे.

बंगल्यात अनेक सरकारी कार्यालये आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) वेळोवेळी देखभाल आणि दुरूस्तीमुळे या बंगल्यांना नवीन झळाळी दिली. मात्र, ‘पीडब्ल्यूडी’ आता हे ब्रिटिशकालिन महत्त्वाचे बंगले पाडून येथे फौजदारी न्यायालय, सेंट्रल बिल्डींग क्रमांक-२, जमाबंदी आयुक्त कार्यालयासह ‘पीएमआरडीए’ येथे उभारणार आहे. तसेच येथे २५ लाख चौरस फुटाचे मेट्रो मॉल बांधणार आहे. त्यामुळे हे सर्व बंगले आता इतिहासजमा होणार आहेत.

नगर रस्त्यावरील गुंजन चौक ते येरवडा टपाल कार्यालया दरम्यान हे ब्रिटिशकालीन सोळा बंगले आजही इतिहासाची साक्ष देत उभे आहेत. या सर्व बंगल्यात ब्रिटीश अधिकारी राहत होते. त्यामुळे प्रशस्त बंगले, मोठ्या खोल्या, लाकडी जीने, बंगल्याभोवती उद्यान, कारंजे, प्रशस्त प्रवेशद्वार पाहण्यास मिळते. अशा सोळ्या बंगल्यात राज्य सरकारची विविध कार्यालय आज थाटलेली आहेत. आता काही दिवसात हे बंगले कालबाह्य होणार असल्याने या बंगल्यांवर टाकलेली ही धावती नजर.



पहिल्या क्रमांकांच्या बंगल्यात हवेली तालुक्याचे भूमि अभिलेख कार्यालय आहे. दोन व तीन क्रमांकाच्या बंगल्यात सिंचन भवनचे कार्यालय आहे. या बंगल्याचे प्रवेशद्वार आकर्षक आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेते. विभागीय जिल्हा उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथक व पुरातत्त्व विभागाचे कार्यालय बंगला क्रमांक चारमध्ये आहे. बंगला क्रमांक चार पाडून या ठिकाणी फौजदारी न्यायालय उभारण्यात येणार आहे.

पाच क्रमाकांच्या बंगल्यात जिल्हा भूमि अभिलेख व जिल्हा हिवताप नियंत्रण कार्यालय आहे. याठिकाणी २५ लाख चौरस फुटाचे ‘पीएमआरडी’ मेट्रो मॉल उभारणार आहे. भूमि अभिलेख विभागाने बंगला क्रमांक एक व पाचचा चेहरा मोहरा बदलून टाकला आहे. येथे सर्व प्रकारचे जागेचे उतारे, सात बारा संगणीकृत पद्धतीने जतन करून ठेवले आहे. अभिलेख तत्काळ मिळावेत म्हणून आधुनिक पद्धतीने कपाटांमध्ये सुरक्षित ठेवले आहेत. मात्र, त्यांना सुद्धा हा बंगला सोडावा लागणार आहे. त्यानंतर त्यांचे स्थलांतर सेंट्रल बिल्डिंग क्रमांक दोन मध्ये होणार आहे.

पुणे शहर वाहतूक विभागाचे कार्यालय बंगला क्रमांक सहामध्ये आहे. या कार्यालयाची दुरुस्ती केली असली तरी याठिकाणी जामाबंदी आयुक्तांचे कार्यालय व बंगला होणार आहे. बंगला क्रमांक सातमध्ये सिंचन कार्यालय तर बंगला क्रमांक आठमध्ये विद्युत निरीक्षक व सांख्यिकी कार्यालय आहे. नऊ क्रमाकाचा बंगला येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या ताब्यात आहे. विक्रीकर भवनची इमारत बांधण्यासाठी बंगला क्रमांक दहा व तेरा तोडले आहे. रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय व नगररचना कार्यालयासाठी बंगला क्रमांक अकरा देण्यात आला आहे. बारामध्ये स्थानिक सिंचन भवनचे कार्यालय आहे. बंगला क्रमांक चौदामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे भूमि अभिलेख कार्यालय आहे. गुंजन चौकासमोरील बंगला क्रमांक पंधरामध्ये हवेली सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय आहे. भिमाशंकर सरकारी कर्मचारी वसाहतीच्या आवारात असलेल्या बंगला क्रमांक सोळामध्ये उपनियंत्रक वैधमापन शास्त्र विभागाचे कार्यालय थाटले आहे. हे सर्व कार्यालय आता लवकरच इतिहास जमा होणार आहेत.

### बंगल्यांना झळाळी

सरकारी कार्यालय म्हटले की तेथे नागरिकांची मोठया प्रमाणात ये-जा असते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी या सोळा बंगल्यांची देखभाल व दुरूस्ती केल्यामुळे त्याला झळाळी मिळाली आहे. हे सर्व बंगले पुरातत्त्वदृष्टीने अतिशय महत्त्वाचे असून ब्रिटीशकालीन वास्तुशास्त्राचा सुंदर नमुना पाहण्यास मिळतो. शंभर ते सव्वाशे वर्षांनंतरही हे सर्व बंगले मजबुत आहेत.

# जिल्ह्यात 65 लाख रुपयांची रोकड आणि वाहन जप्त

## लोकसभा निवडणुकीमुळे भरारी पथकाची धडक कारवाई, पुणे- नागपूरमध्ये लाखोंची रक्कम जप्त

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहिता काळात ५० हजारांपेक्षा जास्त रोख रक्कम जवळ बाळगता येत नाही. जास्त रक्कम घेऊन फिरणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. आता पुणे आणि नागपूरमध्ये भरारी पथकाने लाखोंची रोकड जप्त केली आहे. पुणे जिल्ह्यात ६५ लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. भोसरी एमआयडीसी पोलिसांनी फॉरच्यूनर गाडीची तपासणी केली. त्यावेळी त्यात १३ लाख ९० हजार ५०० रुपयांच्या नोटा मिळाल्या. दुसऱ्या घटनेत शिरूर पोलिसांनी शहरातील कमान पुलाजवळ ही कारवाई केली. या ठिकाणी एका खासगी वाहनातून ५१ लाख १६ हजार रुपये जप्त केले. एकूण ६५ लाखांची रक्कम जप्त करून ती कोषागारात ठेवण्यात आली आहे. प्राप्तीकर विभागाच्या चौकशीनंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

### नागपूरमध्ये धडक कारवाई

पुण्याप्रमाणे नागपूरमध्ये पथकाने रोकड जप्त केली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एसएसटी आणि नागपूर ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. या पथकाने एकूण 10 लाख 35 हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली. नागपूर चंद्रपूर महामार्गावर एका स्कॉर्पिओ गाडीतून ही रक्कम जप्त करण्यात आली. ही रक्कम कोणाची आणि कशासाठी वापरली जाणार होती, त्याचा शोध पोलीस घेत आहेत. संपूर्ण रक्कम कोषागारात जमा करण्यात आली आहे. या रकमेचा निवडणुकीशी काही संबंध आहे का? हे सुद्धा तपासल्या जात आहे.



लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाचे पथक सज्ज झाले आहे. महाराष्ट्रामध्ये प्रवेश करणाऱ्या वाहनांवर या नियंत्रण पथकाचे लक्ष आहे. इतर राज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या तसेच संशयास्पद वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यात असणाऱ्या महाराष्ट्र गुजरात सीमेवर तसेच केंद्रशासित प्रदेशाच्या सीमेवर तीन पथक तैनात करण्यात आले आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाने गुजरात आणि इतर राज्यातून महाराष्ट्रात प्रवेश करणाऱ्या चार चाकी वाहन तसेच इतर प्रवासी वाहन यांची पोलीस आणि स्थिर नियंत्रण पथकाकडून कसून तपासणी केली जात आहे. निवडणूक काळात मतदारांना मतदानासाठी मद्य तसेच पैशाचे आमिष दाखवले जाते. याला आळा बसावा याकरिता निवडणूक आयोगामार्फत कठोर अशी पावले उचलण्यात आली आहेत. यासाठी सीमावर्ती भागांमध्ये स्थिर नियंत्रण पथक आणि पोलिसांमार्फत करडी नजर ठेवण्यात आली आहे.